FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S. 2023)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे ला. प्र. वि. पहिली खबर क्र. 08 वर्ष 2024 दिनांक 10/07/2024
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७(अ)
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून १८/१०/२०२४, वेळ ........, तारीख पर्यंत १०/०७/२०२४ वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा तारीख १८/१०/२०२४ वेळ ........
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 03/24, तारीख 10/07/2024, वेळ 06.45 वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..२२ कि. मी.., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव गोपाळ कळा ठिकाणाचे नंबर हॉटेल, पहिला गल्ली मजला, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण अंबिका कुंज बस डेपो शेजारी, गाव ........, पोस्ट ........, तालुका सांताक्रुझ (पु), जिल्हा मुंबई-५५ राज्य ........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name कु. कल्पिता संजय चौधरी (b) वडीलाचे / पतीचे नाव संजय चौधरी
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय २७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९३२४९२६४७७
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion ........, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता ६, स्लोह गल्ली / सुवर्ण लक्ष्मी त्रिवेणी नं. / नाव नंबर को.ऑ.हौ. फोन / मो. नंबर सोसायटी, पॅन नं. रसबाग, वोटर्स नं. ........
Address Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव लेन नंबर-२ जवळचे प्रसिद्ध ठिकाण कल्याण (प), गाव कल्याण, पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

बॉबी किशोर मेनेकर, वय-२८ वर्षे, पत्ता - रु. नं. ६, शेट्टी चाळ, कांतीलाल कंपाऊंड, जिजामाता मार्ग, अंधेरी (पु), मुंबई-४०००९३

खरी नक्कल
(signature)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

कु. कल्पिता संजय चौधरी, वय - २७ वर्षे, धंदा - नोकरी, पत्ता - ६, स्नेह लक्ष्मी त्रिवेणी हाऊसिंग सोसायटी, रामबाग लेन नंबर - १, कल्याण (पश्चिम) ठाणे यांचा स्वतंत्र पानावर हस्तलिखित केलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(नारायण खरोडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

17/01/2025
कल्पिता संजय चौधरी

फिर्यादी जबाब दिनांक १७/०१/२०२५

कुमारी कल्पिता संजय चौधरी, वय २७ वर्षे, व्यवसाय- नोकरी, डिबीआरई इंडीया प्रा.लि. (प्रोजेक्ट कोऑडीनेटर) रा.ठि. - २०६ बी विंग, स्नेहलक्ष्मी त्रिवेणी को ऑ हौ सो, दिप्ती क्लासेस जवळ, रामबाग लेन नं. १, कल्याण, (प), नविन पत्ता:- बी/७०४ शंकेश्वर पल्स, मुथा कॉलेज समोर, आधारवाडी जेल रोड, कोलीवली व्हिलेज, कल्याण पश्चिम, मो.नं.९३२४९२६४७९

------------

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर माझे जन्मा पासुन माझे परिवारासह राहाण्यास आहे. मी डिबीआरई इंडीया प्रा.लि.पत्ता - तळ मजला, ४६६ न्यु अपोलो को ऑ हौ सो, ब्लु टोकाई कॉफी जवळ, १४ वा रस्ता, खार (प), मुंबई या ठिकाणी प्रोजेक्ट कोऑर्डीनेटर म्हणून काम पहाते. आमची कंपनी लायसन्स ॲन्ड लायझनिंगचे काम करते. आमच्या कंपनीचे मालक श्री महादेव बाबुराव बिरादर उर्फ देवा हे आहेत. आमच्या कंपनीतर्फे नविन फॅक्टरीना व इमारतीना परवाना मिळवून देणे, फायर लायसन्स मिळवून देणे, रेस्टॉरेन्ट बार करीता लायसन्स मिळवून देणे, हॉस्पीटल इत्यादी आस्थापनांना विविध लायसन्स बनवून देण्याचे काम केले जाते. ज्या अस्थापनांच्या मालकांनी परवान्याकरीता आमच्या कंपनीकडे अर्ज केला त्या संदर्भातील कागदपत्रे त्यांच्याकडून घेवून परवाना देणाऱ्या संबंधीत कार्यालयाच्या वेबसाईडवर लायसन्स करीता लॉगिंग करून त्याची पुर्तता करण्याचे काम मी करते.

दिनांक ०३/०५/२०२३ रोजी अरविंद फॅमिली रेस्टॉरन्ट पत्ता- शॉप नं. १, प्रभात को ऑ सोसायटी, कलीना कुर्ला रोड, कोलावरी व्हिलेज, सांताक्रुझ पुर्व, मुंबई चे मालक श्री. देवानंद तिवारी यांनी आमच्या कंपनीस पीएनजी कनेक्शन, पिएनजी रजिस्ट्रेशन, मिटर इन्स्टॉलेशन व गॅस चार्ज करीता वर्क ऑर्डर दिली होती. मी आमच्या कंपनीतफे त्यांना रू. ५०,०००/-चे कोटेशन देवून अरविंद फॅमिली रेस्टॉरन्ट यांची कागदपत्रे प्राप्त करून महानगर गॅस लिमिटेडच्या वेबसाईडवर संबंधीत परवान्या करीता लॉगिंग केले होते. आमच्या कंपनीच्या वतीने मी फॉलोअप घेत होते.

दिनांक १६/१०/२०२४ रोजी १२.५२ वाजताचे सुमारास मोबाईल क्र. ८८२८३६५७२४ वरून आमच्या कंपनीच्या मोबाईल क्रमांक ९३२४९२६४७९ या क्रमांकावर फोन आला. समोरच्या व्यक्तीने तो महानगर गॅस लिमिटेडचा प्रोजेक्ट मॅनेजर असून त्याचे नाव बॉबी सेनेकर असल्याचे सांगितले. आमच्या कंपनीने अरविंद रेस्टॉरेन्टकरीता गॅस कनेक्शनसाठी जे काम दिले आहे त्याकरीता खोदकाम करावे लागणार असल्याचे त्याने सांगितले. तसेच खोदकाम करण्याकरीता बीएमसी अधिकाऱ्यांना रू. २०,०००/- टेबलाखालून दयावे लागणार असल्याचे सांगून त्याने रू. २०,०००/-ची मागणी केली.

महानगर गॅस लिमिटेड चे प्रोजेक्ट मॅनेजर बॉबी सेनेकर यांनी मागणी केलेली रक्कम हि कोणतीही शासकीय शुल्क नसल्याने मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्या विरूध्द तक्रार देणेकरीता दि.१८/१०/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे आले व लेखी तक्रार अर्ज दिला.

माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाप्रवि, मुंबई विभागाचे पोलीस निरीक्षक, श्री. हेमंत खंडु नागरे यांची नेमणुक करण्यात आली त्यानंतर पो.नि. नागरे यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दिनांक १८/१०/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पोनि नागरे यांचे सुचनेप्रमाणे मी बॉबी सेनेकर यांना संपर्क करून कामा संदर्भात लाचेची मागणी करणारे बीएमसी अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घ्यायची असल्याचे सांगून ते कधी भेटतील असे विचारले असता, बॉबी सेनेकर यांनी सांगितले की, 'मला तुम्ही सोमवारी कॉल करा मी त्यांचा वेळ घेवून तुमची भेट करून देतो'.

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

त्यानुसार सोमवार दिनांक २१/१०/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पोनि नागरे यांचे सुचनेप्रमाणे मी बॉबी सेनेकर यांना संपर्क करून बॉबी सेणेकर यांना बीएमसी अधिकाऱ्यांच्या भेटीबाबत विचारणा केली असता, त्यांनी प्रथमत: भेटता येणार नसल्याचे सांगितले व त्यानंतर मला एक दिवस दया, मी विनंती करतो तुम्ही मला उदया ११.०० वा. कॉल करा, असे सांगितले व कॉल कट केला.

दिनांक २२/१०/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पोनि नागरे यांचे सुचनेप्रमाणे मी बॉबी सेनेकर यांना पुन्हा त्यांचे मोबाईलवर संपर्क केला असता, आमच्या मधील कामाच्या चर्चे दरम्यान मी लाचेच्या रक्कम कमी करण्याबाबत चर्चा केली असता बॉबी सेनेकर यांनी सांगितले की, पंधरा हजार रूपयांपेक्षा काहीच पैसे कमी होणार नाहीत. सदरचे पैसे तुम्ही बीएमसी अधिकाऱ्याकडे डायरेक्ट देवू शकत नाही. त्याने बीएमसीला पैसे दिल्यानंतर बीएमसी परमीट देणार या बाबत तुमच्या मालकाशी चर्चा करून पुन्हा कॉल करण्याबाबत मला सांगितले.

त्यानंतर पोनि नागरे यांचे सूचनेप्रमाणे मी पुन्हा बॉबी सेनेकर यांचे मोबाईल क्रमांक ८८२८३६५७२४ वर संपर्क करून मालकासोबत बोलणे झाले असून लाचेची रक्कम रुपये १५,०००/- कोठे व कधी घेवून येण्याबाबत विचारले असता, बॉबी सेनेकर यांनी लाचेची रक्कम घेवून रात्री ०७.३० ते ०८.०० वा. चे दरम्यान सांताक्रुझ येथे घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर १९.३७ वा. बॉबी सेनेकर यांनी समोरून त्यांचे मोबाईल नंबर ८८२८३६५७२४ वरून मला कॉल केला. त्यावर पोनि नागरे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी बॉबी सेनेकर यांना भेटण्याकरीता सांताक्रुझ रेल्वे स्टेशनजवळ पूर्व बाजूस असलेल्या गोपाळ क्रिष्णा रेस्टॉरंन्टच्या एसी सेक्शनमध्ये बोलवले. तेव्हा बॉबी सेनेकर यांनी सहमती दर्शवून फोन कट केला.

बॉबी सेनेकर यांना सांगितल्या प्रमाणे मी गोपाळ क्रिष्णा रेस्टॉरंन्टच्या एसी सेक्शनमध्ये गेले.त्या ठिकाणी सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले. रेस्टॉरंन्टमध्ये भेटी दरम्यान माझे व बॉबी सेनेकर यांचेमध्ये गॅस कनेक्शनबाबत बोलणे झाले. चर्चे दरम्यान बॉबी सेनेकर यांनी त्यांचे मोबाईलवरून एका इसमास कॉल केला व ते त्यांचे सर असून त्यांचे नाव सतिश सर असून ते सुध्दा प्रोजेक्ट मॅनेजर असल्याचे सांगितले. नमुद संभाषणामध्ये सतिश सर यांनी देखिल माझे काम पुर्ण झाल्यावर लाचेची रक्कम घेणार असल्याचे कबूल केले. बराच वेळ चर्चा झाल्यानंतर बॉबी सेनेकर हा रेस्टॉरंन्टमधून बाहेर येवून तेथून निघून गेला. सापळा कारवाई दरम्यान माझे व बॉबी सेनेकर यांच्यामध्ये झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्याप्रमाणे पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक ११/१२/२०२४ रोजी मी पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक हेमंत नागरे यांचे समक्ष हजर झाले. पो.नि. नागरे यांच्या सांगण्यावरून मी माझे मोबाईल वरून बॉबी सेनेकर यांचे मोबाईल वर संपर्क केला असता, माझे प्रलंबित काम पुर्ण झाले असून, थॅक्यु बोलण्याकरीता कॉल केला असल्याचे सांगितले. तेव्हा बॉबी सेनेकर यांनी ठिक आहे, असे बोलून कॉल कट केला. वरील संभाषणादरम्यान बॉबी सेनेकर यांनी लाचेच्या रक्कमेबाबत कोणतेही भाष्य केले नाही.

समक्ष

(नारायण सरोदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कल्पिता संजय चौधरी

Scanned with OKEN Scanner

दिनांक ११/०१/२०२५ रोजी बॉबी सेनेकर यांनी माझे मोबाईलवर व्हॉट्सअप संदेशाव्दारे गॅस कनेक्शनचे काम झाल्याबाबत चर्चा करून कॉफी पिण्याचे मेसेज केल्याने मी दिनांक १३/०१/२०२५ रोजी लाप्रवि कार्यालयात समक्ष हजर झाले, परंतु नमुद मेसेजमध्ये बॉबी सेनेकर यांनी लाचेबाबत कोणतीही चर्चा केली नसल्याने त्यावर काहीही कारवाई करण्यात आली नाही. दिनांक १३/०१/२०२५ रोजी १६.०२ वा. बॉबी सेनेकर यांनी व्हॉट्सअप कॉलव्दारे चर्चा करून गॅस कनेक्शनचे काम पूर्ण झाल्याने तुम्ही तुमच्या सरांशी चर्चा करून तुम्हाला जे काही स्वखुशीने दयायचे आहेत ते तुम्ही दया, परंतु माझी कोणतीही मागणी नाही असे सांगितले. त्यावर मी बॉबी सेनेकर यांना सदरबाबत कंपनीच्या सरांशी बोलून कळविते असे सांगितले होते. त्यानंतर दिनांक १४/०१/२०२५ रोजी मी लाप्रवि कार्यालयात समक्ष हजर झाले. परंतु पोनि हेमंत नागरे हे अर्जित रजेवर असल्याने सदरचे प्रकरण हे पुढील चौकशीकरीता पोनि नारायण सरोदे यांना दिलेले असून सहायक पोलीस आयुक्त निरज उबाळे यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नेमणूक केलेली असल्याचे पोनि सरोदे यांनी सांगितले. त्यानंतर मी लाप्रवि कार्यालयातील सहायक पोलीस आयुक्त निरज उबाळे व पोलीस निरीक्षक नारायण सरोदे यांचे समक्ष हजर झाले असता त्यांनी माझी पंचासोबत ओळख करून दिली.

तसेच दिनांक १४/०१/२०२५ रोजी नमुद प्रकरणी श्री बॉबी सेनेकर यांचे मोबाईलवर संपर्क करून मागणी केलेल्या लाचेची रक्कम स्विकारण्याकरीता ते मला कधी व कोठे बोलावतात यावरून पुढील सापळा पुर्व / सापळा कारवाई करणार असल्याचे पोनि सरादे यांनी पंचास सांगितले. त्यानंतर पंच, सपोआ उबाळे, पोनि सरोदे व मी असे लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षात गेलो.

पो.नि. सरोदे यांनी माझेत आणि बॉबी सेनेकर यांच्यात होणारे मोबाईलवरील संभाषण व्हाईस रेकॉर्डर मधील एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. पोनि सरोदे यांचे सुचनेप्रमाणे १८.४३ वा. पंचासमक्ष मी माझे मोबाईल क्रमांक ९३२४९२६४७९ वरून बॉबी सेनेकर यांचे मोबाईल क्रमांक ८८२८३६५७२४ वर संपर्क केला असता, बॉबी सेनेकर यांनी माझा कॉल उचलून लाचेची रक्कम स्विकारण्याबाबत चर्चा केली. चर्चे दरम्यान बॉबी सेनेकर यांनी ''मी एक दिवस आधी कॉल करून लाचेची रक्कम कधी व कोठे घेवून येण्याचे सांगतो'' असे सांगितले. सदर मोबाईलवरील संभाषणामध्ये बॉबी सेणेकर यांनी माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम ही मला एक दिवस आधी कॉल करून कधी व कोठे घेवून यायचे याबाबत कळवितो असे सांगितल्याने दिनांक १४/०१/२०२५ रोजीची कारवाई स्थगित करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझे मोबाईलवर बॉबी सेनेकर यांनी व्हॉट्सअपव्दारे मेसेज करून मागणी केलेल्या लाचेची रक्कम घेवून सायंकाळी ७.०० ते ८.०० वाजताचे सुमारास गोपाळ कृष्ण हॉटेल, सांताक्रुझ या ठिकाणी येण्याबाबत कळविले असल्याने मी दि.१६/०१/२०२५ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर झाले. दुसऱ्या मजल्यावरील रूम नंबर २२० येथे सपोआ उबाळे व पोनि सरोदे यांना भेटून बॉबी सेनकर यांच्या मेसेजबाबतची माहिती दिली. पोनि सरोदे यांनी तात्काळ पंचांना बोलावून सापळा कारवाई करावयाची असल्याचे पंचास सांगीतले. त्यानंतर मी, पंच, सपोआ उबाळे, पोनि सरोदे असे लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षात गेलो. तेथे पोलीस अंमलदार विशाल मिंडे उपस्थित होते. तेथे प्रथम पोनि/ सरोदे, मी व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले गेले. वक्तव्य ध्वनीमुद्रीत केल्यानंतर पंच, सपोआ उबाळे, पोनि सरोदे व मी असे सपोआ उबाळे यांचे

समक्ष

(नारायण सरोदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कल्पिता संजय चौधरी

Scanned with OKEN Scanner

कक्षामध्ये गेलो. तेथे पोनि सरोदे यांनी सापळा पथकास बोलावून घेतले. पो.नि. सरोदे यांनी पंचाना सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार व पोलीस वाहने/वाहन चालक यांची सापळापुर्व/सापळा पथकात नेमणुक करण्यात आली असल्याचे सांगून, त्यांची पंचांना ओळख करुन दिली.

त्यानंतर सपोआ उबाळे यांनी मला, पंचाना, व सापळा कारवाई पथकातील पोलीस अमंलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. मी पंचासमक्ष पोनि सरोदे यांच्याकडे बॉबी सेनेकर यांना दयावयाची रक्कम रू. १५,०००/- पोनि सरोदे यांचेकडे हजर केली. सदर नोटांचे लाप्रवि कार्यालयातील झेरॉक्स मशिनवर झेरॉक्स काढल्या. पो.नि. सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे नोटांच्या झेरॉक्स काढलेल्या प्रतिवर पंचानी स्वाक्षऱ्या केल्यानंतर पो.नि. सरोदे यांनी समक्ष म्हणून स्वाक्षरी करुन सदरच्या प्रति ताब्यात घेतल्या. त्यानंतर पो.नि. सरोदे यांनी महिला पोलीस अंमलदार श्रीमती पाटील यांना माझे सर्वांगांची तपासणी करून अंगझडती घेतली.

त्यानंतर पो.नि. सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे पो.ह.कावले यांना बोलाविण्यात आले त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या पेटीमधील डब्यातील अॅन्थ्रॉसीन पावडर दाखवुन त्याच्या गुणधर्मा संदर्भातील माहिती दिली. तसेच अॅन्थ्रासीन पावडरच्या गुणधर्माबाबात माहिती देवून प्रात्यक्षिक देखिल करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. सरोदे यांनी लाचेची रक्कम रुपये १५,०००/- (रूपये ५००/- दराच्या ३० भारतीय चलनी नोटा) रक्कमेस पो.ह. कावळे यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, त्यांनी सदरच्या सर्व नोटांच्या दोन्ही बाजूस कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पो.नि. सरोदे यांचे सुचनेवरुन पो.ह.कावळे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या नोटांची घडी घालून त्या नोटा माझेकडे असलेल्या लॅपटॉप बॅगच्या चैनीच्या पहिल्या कप्प्यात ठेवल्या.

त्यानंतर पो.नि. सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार यांनी सापळा कारवाईसाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री घेवुन कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या दोन टाटा सुमो पोलीस वाहनांमध्ये विभागून बसलो. पो.नि. सरोदे यांनी नमुद दोन्ही वाहन चालकांना वाहने एकत्रित एकामागोमाग एक याप्रमाणे सांताक्रुझ रेल्वे स्टेशनजवळ (पुर्व) च्या दिशेने घेण्यास सांगितले. सांताक्रुझ रेल्वे स्टेशनजवळ पूर्व बाजूस असलेल्या बेस्ट बस डेपोच्या जवळ आल्यानंतर पो.नि. सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस वाहने कोणासही संशय येणार नाही, अशा रितीने रस्त्याच्या बाजूला थांबविण्यात आले. प्रवासा दरम्यान पो.नि. सरोदे यांनी पंचाना व मला सापळा कारवाई दरम्यान आवश्यक असलेल्या सुचना पून्हा दिल्या. तसेच मला लाचेची रक्कम दिल्यावर करावयाच्या इशाऱ्याबाबतची माहिती दिली. दरम्यानच्या वेळेत बॉबी सेनेकर यांनी फोन केला असता मी तो उचलला नाही म्हणून त्यांनी माझे मोबाईलवर टेक्स मेसेज करून मी निघु का असे विचारले. त्यानंतर बॉबी सेनेकर यांनी समोरून त्यांचे मोबाईल नंबर ८८२८३६५७२४ वरून मला कॉल केला. मी त्यांना भेटण्याकरीता सांताक्रुझ रेल्वे स्टेशनजवळ पूर्व बाजूस असलेल्या गोपाळ क्रिष्णा रेस्टॉरंन्टच्या एसी सेक्शनमध्ये बोलवले. तेव्हा बॉबी सेनेकर यांनी सहमती दर्शवून फोन कट केला. त्यानंतर मी भेटीकरीता जाण्यापुर्वी पो.नि. सरोदे यांनी पंचासमक्ष त्यांच्याकडील डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून तो चालू करुन मी परिधान केलेल्या टॉपच्या आतील बाजुस मपोशि पाटील यांचे मदतीने लावला. त्यानंतर मी व माझे पुढे मागे सापळा पथक वेगवेगळे चालत चालत गोपाळ

समक्ष

(नारायण सरोदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

17/01/2025
कल्पिता संजय चौधरी

Scanned with OKEN Scanner

क्रिष्णा रेस्टॉरंन्टच्या एसी सेक्शनमध्ये गेले. थोडयाच वेळात बॉबी सेनेकर मी बसलेल्या टेबलजवळ आला व माझे समोरील खुर्चीवर बसला. बॉबी सेनेकर यांनी माझेकडे कामाबाबत चर्चा केली व लाचेच्या रकमेची मागणी केली त्यानुसार मी त्यांना लाचेची आणलेली रक्कम रु. १५,०००/- बॉबी सेनेकर याच्याकडे दिली. सदर रक्कम त्याने त्याचे पँटच्या मागील बाजूच्या डाव्या खिशात ठेवली. त्यांनतर मी सापळा पथकास डोक्यावर हात फिरवून पूर्वनियोजित इशारा केला असता, दबा धरून बसलेल्या पथकामधील अधिकारी व अंमलदारांनी बॉबी सेनेकर यांना रंगेहाथ ताब्यात घेतले.

तरी इसम नामे बॉबी किशोर सेनेकर यांनी आमच्या डिबीआरई इंडीया प्रा.लि. या कंपनीचे क्लायंट अरविंद रेस्टॉरेन्टच्या गॅस कनेक्शनसाठी बीएमसी अधिकाऱ्यांना लाच द्यावी लागेल असे सांगून लाचेची रक्कम म्हणून आमचे कंपनीच्या वतीने माझे कडून रु. १५,०००/- मागणी केली व ती स्विकारली असता त्यास रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून माझी त्यांचे विरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठित संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मला मराठित वाचून हिंदीतून समजावून सांगितला, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(नारायण सरोदे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

१७/०१/२०२५
कल्पिता संजय चौधरी

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य
Total Value of properties stolen / involved ५०० रु दराच्या भारतीय चलनाच्या ३० नोटा

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ५४,०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.
यातील नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या नोकरीस असलेल्या डीबीआरई या कंपनीमध्ये प्रोजेक्ट.को ऑरडीनेटर म्हणून कामास आहेत. त्यांच्या कंपनीमार्फत लायसन्स व मनपा लायसनिंगचे काम केले जाते. फिर्यादी यांचे कंपनीमार्फत दि.०३/०५/२०२३ रोजी अरविंद फॅमिली रेस्टारंट यांना पीएनजी कनेक्शन पीएनजी रजिस्ट्रेशन, मीटर कनेक्शन इत्यादी कामाची वर्क ऑर्डर घेतलेली होती. अरविंद रेस्टॉरंटच्या गॅस कनेक्शनसाठी मनपा अधिकाऱ्यांना लाच द्यावी लागले असे सांगून लाचेची रक्कम म्हणून फिर्यादी यांच्या कंपनीच्या वतीने त्यांच्याकडून रु.५४०००/- मागणी केली व ती स्विकारली असता रंगेहाथ ताब्यात घेतल्याने गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
नारायण सरोदे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

17/01/2025

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name नारायण सरोदे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई
Code No. of I. O. ..........

14. तक्रारदाराची सही व अंगठा अर्पिता संजय चौधरी
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

खरी नक्कल

Attachment to item 7 of **First Information Report**

पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner